


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार १ डिसेंबर २०२४ | अंक ३५७ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# मध्य प्रदेश आणि राजस्थान प्रमाणे भाजप महाराष्ट्रात ही सरप्राईज देणार?

## एकनाथ शिंदेंनी सोडला दावा

**देवा भाऊ हे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत सर्वात आघाडीवर आहेत. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुख्यमंत्रीपदावरचा दावा सोडल्याने त्यांचा मार्ग जवळपास मोकळा झाला. पण तरीही दबक्या आवाजात कुठे तरी चर्चा आहे की, भाजपचे वरिष्ठ नेते कोणता दुसरा निर्णय तर घेणार नाहीत. ना. देवेंद्र फडणवीस यांनी केवळ चांगली कामगिरी केली नाही तर शिस्तप्रिय कार्यकर्त्याप्रमाणे पक्षाचे काम केले. अशा स्थितीत देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार आहेत यात शंका नाही.**



## मोदी-शाह सरप्राईज देणार?

पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाहा हे अनेकदा सरप्राईज प्लॅन्स देतात. हे संपूर्ण देशाला माहित आहे. गेल्या वर्षीच मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये ते दिसून देखील आलं. पराभूत झाल्यानंतर ही पुष्कर सिंह धामी यांना पुन्हा उत्तराखंडचे मुख्यमंत्री बनवले. हरियाणामध्ये भाजपने माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रीपदावरुन बाजुला करुन त्यांना केंद्रात आणलं. त्यांच्या जागी नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्री केलं.

भाजपकडून महाराष्ट्रात इतर कोणत्या नेत्याला मुख्यमंत्री केलं जाणार अशी चर्चा देखील सुरु आहे. कारण शिवसेना आणि राष्ट्रवादीने आपला विधीमंडळाचा गटनेता जाहीर केला. पण भाजपकडून अजूनही गटनेता जाहीर झालेला नाही. त्यामुळे त्याला उशीर का होत आहे असा प्रश्न अनेकांना पडला आहे. भाजप हायकमांड कोणता वेगळा निर्णय घेऊ शकतो का असा प्रश्न ही कायम आहे.

**मुंबई** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या दणदणीत विजयाचे संपूर्ण श्रेय हे देवेंद्र फडणवीस यांनाच दिले जात आहे. निवडणुकीत देवाभाऊ प्रचंड गाजले. त्यांचा मी पुन्हा येईल हा व्हिडिओ देखील प्रचंड व्हायरल झाला. २०१४ ते २०१९ असा पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राहिले. २०१९ मध्ये देखील ते पुन्हा मुख्यमंत्रीपदाजवळ आले. पण शिवसेनेने युती तोडल्याने त्यांना विरोधी पक्षात बसावे लागेल. त्यांनंतर अडीच वर्षात ते पुन्हा मुख्यमंत्री होणार असं चित्र निर्माण झालं असताना पक्षाने मात्र त्यांना उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी दिली. पण फडणवीस यांना संयम सोडला नाही आणि त्याचं फळ त्यांना या निवडणुकीत मिळालं.



बीड : मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे हे उपस्थित होते.

अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सुनील पाटील, श्रीराम आरगडे, संतोष डावकर, रणवीर पंडित, महेश मोटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते : शिंदे
## रोलबॉलमध्ये बीड, हॉकीत छत्रपती संभाजीनगरचा दबदबा

**( बीड प्रतिनिधी )**

बीड, दिनांक ३० : खेळात खिळाडूवृत्ती हवी. जो संघ विजयी होतो, त्यांनी हुरळून जाऊ नये. कारण पराभूत संघाचा ही खेळ चांगला असतो. अनेकदा थोड्याफार चुकांमुळे अपयश येते. या चुका सुधारून यशाला गवसणी घालता येते. त्यासाठी खेळाडूंनी एकाग्रतेने खेळत रहावे, असे मार्गदर्शन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी खेळाडूंना केले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषदेच्या विद्यमाने व जिल्हा हॉकी असोसिएशन आणि रोलबॉल असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय शालेय हॉकी व रोलबॉल स्पर्धा नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुलात घेण्यात आल्या.स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा संकुलात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, पत्रकार सोम नाथ खताळ, जिल्हा हॉकी संघटक प्रा. दिनकर थोरात, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडाधिकारी कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील, सतीश राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे जमादार श्री. सांगळे, हॉकी प्रशिक्षक व पंच अकबर खान, संस्थापक कार्याध्यक्ष म्युझिकल चेअर इंडिया तुकाराम ठोंबरे, रोल बॉल संघटनेचे सचिव रामदास गिरी उपस्थित होते. स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागातील १० पेक्षा जास्त संघांनी सहभाग नोंदविला. रोलबॉल स्पर्धेत बीड आणि परभणीचे तर हॉकी स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंचे वर्चस्व राहिले. हॉकी स्पर्धेकरिता पंच म्हणून अकबर खान, शेख समीर, पवन ढाकणे, मोहमद वसीम तसेच रोलबॉल स्पर्धेकरिता वैभव गिरी, सुधीर हजारे, शरद पवार यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर, अनिकेत काळे, क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, अविनाश पाटील, क्रीडा संयोजक जितेंद्र आराक, वरिष्ठ लिपिक धनेश करांडे, कनिष्ठ लिपिक त्रिगुणा वाघमोडे, मंगेश वडमारे यांनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक श्री.विद्यागर यांनी केले. सूत्रसंचालन जितेंद्र आराक यांनी केले.

हॉकी निकाल –

**१९ वर्षांखालील मुले** : प्रथम गीता गुरुकुल विद्या मंदिर, फुलंबी जि. छत्रपती संभाजीनगर द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**१९ वर्षांखालील मुली** – प्रथम युरेका इन्फोसिस स्कूल, छत्रपती संभाजीनगर, द्वितीय डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

रोलबॉल निकाल १४ वर्षांखालील मुली – प्रथम गुरुकुल पब्लिक स्कूल, बीड

१४ वर्षांखालील मुले – प्रथम गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड, द्वितीय – स्कॉटिश अकादमी, परभणी

**१७ वर्षांखालील मुले** – प्रथम सेंट ॲगस्टोन इंग्लिश स्कूल, परभणी द्वितीय – पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, हिंगोली

## जागतिक एड्स दिनानिमित्त विविध कार्यक्रम; उद्या प्रभात फेरी

बीड, दिनांक ३० : जिल्हा रूग्णालयाच्या जिलहा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाच्यावतीने जागतिक एड्स दिन व सप्ताहा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग कार्यायालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले आहे.दरवर्षी एक डिसेंबर जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. यंदाचे घोषवाक्य (ढरज्ञश ढहश ठळसहींी झरींह) मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! असे आहे. या दिनाचे औचित्यसाधून सोमवारी (ता.०२ डिसेंबर) सकाळी ०८:३० वाजता श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून प्रभात फेरीचे आयोजन केले आहे. ही प्रभात फेरी दरवर्षीप्रमाणे श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक– कारंजा–बलभीम चौक–धोंडीपुरा–माळीवेस–सुभाष रोड– लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक – बस स्टँड – श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने मार्गस्थ होणार आहे. सामाजिक न्याय भवन बीड येथे या प्रभात फेरीचा समारोप होईल.

जिल्हास्तर व वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर एआरटी केंद्रामध्ये उपचार घेणा–्या एचआयव्ही संसर्गित बालकांसाठी चित्रकला (पोस्टर स्पर्धा) होणार आहे. त्यासाठी माझ्या स्वप्नातील भारत, स्त्री–पुरुष समानता, एचआयव्ही, एड्स जनजागृती असे विषय आहेत. यामध्ये गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्यांना अनुक्रमे रु.१५००, रु.१०००, रु.५०० असे बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

विविध रेड रिबन क्लब महाविद्यालयांमध्ये जिल्हास्तर व तालुकास्तरावर एचआयव्ही, एड्सबाबत व्यापक जनजागृती व्हावी या उद्देशाने जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये फ्लॅश मॉब, पोस्टर प्रदर्शन आदींचे आयोजन करण्यात येणार आहे, असेही त्यांनी कळविले आहे.

## बालकांच्या पालक, नातेवाईकांचा शोध घेण्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना आदेश

बीड, दिनांक ३० : बीडच्या बालकल्याण समितीने शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथील सनी गायकवाड, प्रीतम काळे या बालकांच्या पालक व नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांना आदेशित केल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ही दोन्ही बालके शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह येथे काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समितीच्या आदेशाने दाखल झाली आहेत. या दोन्ही बालकांना निरीक्षण गृह, बालगृह येथे दाखल झाल्यापासून कोणीही आई–वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. सदरील वृत्त प्रसारित झाल्यापासून



सनी राजू गायकवाड | प्रीतम दत्तात्रय काळे

३० दिवसाच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बीड, बाल कल्याण समिती, बीड व अधीक्षक, शासकीय निरीक्षण गृह, बालगृह, बीड तसेच संस्थेच्या चाँदमारी क्वार्टर, पालवन चौक, बीड या पत्त्यावर अथवा अधीक्षक (मो. क्र.९९२२९८८८०६) यांच्याशी संपर्क करावा. अन्यथा बाल कल्याण समिती या बालकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल. मुदत संपल्यानंतर कोणताही दावा अथवा हक्क बाल कल्याण समिती ग्राह्य धरणार नाही.

सनी राजू गायकवाड याचा जन्म १० जून २००७ रोजीचा आहे. त्यांचे वय १७ वर्ष ०४ महिने आहे. सध्याचा त्याचा पत्ता बीड येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह आहे. बेवारस अवस्थेत ते सापडले होते. बाल कल्याण समितीच्या आदेशाने या बालकास एक ऑक्टोबर २०१३ रोजी बालगृहात दाखल केले. बालकाचा रंग सावळा असून हनुवटीवर तीळ आहे.

प्रीतम दत्तात्रय काळे याचा जन्म २६ जुलै २०१३ रोजीचा आहे. त्याचे वय ११ वर्ष ०२ महिने असून तो सध्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील शिराळ येथील शासकीय निरीक्षण गृह, बालगृह असा त्याचा सध्याचा पत्ता आहे. हा बालक घरातून निघून गेला होता. तो बालगृहात बाल कल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने २९ डिसेंबर २०२३ रोजी दाखल झाला. हा बालक रंगाने गोरा असून मानेवर उजव्या बाजूला तीळ आहे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

*****

## राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा परिसरात मनाई आदेश लागू

बीड, दिनांक ३० : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा रविवारी (ता.१ डिसेंबर) बीड जिल्हा केंद्रात १० उपकेंद्रामधून घेण्यात येत आहे. ही परीक्षा शांततेत, सरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश लागू असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचा–यांना आदेश लागू नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे परिसरात सर्व ध्वनीक्षेपके इ.परीक्षा सुरू होण्याच्या एक तासापूर्वी ते परीक्षा पेपर संपेपर्यतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचा–यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरिक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रमास, अंत्ययात्रेसाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे. बीड शहरातील नगर रोड येथील चंपावती माध्यमिक विद्यालयात ४८०, नवीन भाजी मंडई परिसरातील संस्कार विद्यालयात ४३२, धानोरा रोड येथील भगवान विद्यालय आणि कॅनॉल रोड येथील शिवाजी विद्यालयात प्रत्येकी ३६०, नगर रोड येथील चंपावती इंग्लीश स्कूल, चंपावती प्राथमिक विद्यालय, शिवाजी नगर येथील सौ.के. एस.के. महाविद्यालय, सुभाष रोड येथील गीता कन्या प्रशाला, किल्ला मैदान येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व श्री. छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात प्रत्येकी उपकेंद्रावर २४० अशी एकूण ३०७२ विद्यार्थी संख्या आहे, असेही आदेशात नमूद आहे.

## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड, दिनांक ३० : बाल हक्क सप्ताहानिमित्त ङ्गबालकांचे हक्कफ या विषयावर शहरातील तेल–गाव रोड येथील राज–र्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गद–र्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढा–कार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन श्री.तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## एड्स प्रतिबंधामध्ये युवकाची मोलाची भूमिका

आज ०१ डिसेंबर जागतिक एड्स दिन. या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये जिल्हा रूग्णालयाकडून विविध जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आपण सर्वांनी सहभागी होऊ याः सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊयाः या दिनार्निमित्त हा विशेष लेख

ङ्कभला जन्म हा तुला लाभला खुलास –हदयी बुधा धरिसी तरी हरिचा सेवक सुधा सुप्रसिद्ध लावणीकार, कवी राम जोशी मानवी नरदेहाबाबत वर्णन करताना ही लावणी गायलेली आहे. चौ–यांशी दशलक्षकोट्या योन्या फिरल्यानंतर मानवाला दुर्लभ असा नरदेह प्राप्त होतो. त्यामुळे त्याने या देहाचा उपयोग विधायक कार्यासाठी करणे आवश्यक आहे. परंतु आज वाढती व्यसनाधिनता नैतिक मुल्याचा –हास, तसेच सहजीवनाचा वाईट परिणाम देशातील लोकांवर मुख्यत्वे करुन युवकांवर पडत असलेला पहावयास मिळत आहे. त्याचा परिणाम देशाची भावी आधारस्तंभ असणारी तरुण पिढी ही एचआयव्ही संक्रमणाला बळी पडत असलेली पहावयास मिळते. मानवी भावना या नैसर्गिक असतात. परंतु या भावनांचा उद्रेक म्हणजेच विनाशास निमंत्रण असते. त्यामुळे त्यामध्ये सुवर्णमध्य साधणे आवश्यक असते.

ङ्कतारुण्याचे तीन ङ्कतफ्कारङ्क

संयम हा मनुष्याच्या डोक्याचा आत्मा आहे, असे थोर विचावंत व तेजस्वी महापुरुष श्री स्वामी विवेकानंद यांनी सांगितले आहे. तसेच तेजस्वीतता, तपस्वीतता, तत्परता हे तारुण्याचे तील त कार आहेत. हे प्रत्यक तरुण–तरुणीमध्ये असले पाहिजेत. परंतु खरोखरच हे तिन्ही गुण आपल्या स्वतः मध्ये आहेत का ? या प्रश्नाचे आत्म संशोधन करण्याची आज वेळ आली आहे. कारण नैतिक शिक्षण आवश्यक झालेले आहे. त्यामुळे व्यक्तीला गतिमानता प्राप्त होण्यास मदत होईल. आजचा युवक व्यसनरूपी चक्रव्युव्हामध्ये अडकत आहे. ज्याचे पर्यावसन १५ ते ४९ या वयोगटातील लोकच आज जास्तीत जास्त व्यसनाधीन, एचआयव्ही बाधित पहावयास मिळताहेत.

एचआयव्ही संक्रमणाला बळी पडण्याचे महत्त्वाचे कारण हे या रोगाबद्दल असलेले अपुरे ज्ञान. तारुण्य अवस्थेतील जल्लोष आहे. त्यामुळे आजच्या युवांनी या आजाराबाबत प्रशिक्षित समुपदेशक, सल्लागार यांच्या मार्फत शास्त्रीय माहिती घेणे आवश्यक आहे. आयसीटीसी केंद्र यामध्ये (दिशा केंद्रामध्ये) येणा–या सर्व व्यक्तींना एचआयव्ही, एड्स बाबत संपूर्ण शास्त्रीय माहिती दिली जाते. तसेच त्यांच्या संमतीनेच त्यांची एचआयव्ही चाचणी केली जाते. चाचणीपूर्व तपासणीमध्ये चाचणी नंतरच्या निष्कर्षाबाबत समोरील व्यक्तीला कल्पना दिली जाते. तपासणीबाबत पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाते. चाचणी पश्चात समुपदेशनामध्ये समोरच्या व्यक्तीच्या मानसशास्त्रीय मुल्याचा अभ्यास करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन केले जाते.

गळणा–या पानांकडे नसते झाडाचे कधी लक्ष – नव्या पालवीलाच असते गोंजारण्यात ते दक्षङ्क

तात्पर्य, परिवर्तन हा काळाचा नियम आहे. या चराचर सृष्टीची निर्मिती ज्या निर्मिकाने उदात्त धोरणाने केली, तो उद्देश सफल करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. संस्कृतीचा वारसा आपण जोपासला पाहिजे. परंतु नवीन इंटरनेट, फेसबुक, व्हॉट्सअप च्या संस्कृतीमध्ये आपण आपली जुनी संस्कृती, नितीमुल्य पायदळी तुडवता कामा नये. वाढती फॅशन, अंगप्रदर्शन तसेच संयमहीन जीवन यामुळे आपण आपले अस्तित्वच विसरत चाललो आहोत. ख–या अर्थाने युवकांनी एड्समुक्त महाराष्ट्र, भारतः स्वप्न नव्हेः ध्येय, हे वाक्य खरे ठरवायचे असेल तर वरील सर्व बाबींचा सारासार विचार करायला हवा.

ङ्क एकटे नाहीत तुम्ही – साथ आहोत आम्ही ङ्क

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. या कक्षांतर्गत विविध आयसीटीसी मार्फत युवकांसाठी एचआयव्ही, एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद, पोस्टर प्रदर्शन इत्यादी उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन वेगवेगळया लक्ष्यगटांमध्ये केले जाते.

यावर्षीचे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य आहे ङ्कढरज्ञश ढहश ठळसहींी झरींहङ्क मार्ग हक्काचा, सन्मानाचा ! हे आहे. म्हणजेच एचआयव्ही संसर्गित लाभार्थ्यांना पण सर्व सामान्य नागरिकांसारखे हक्क आहेत, ते वेगळे नाहीत. त्यांना समाजामध्ये सम्मानाची व आदराची वागणूक दिली पाहिजे. सर्व कौटुंबिक सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, नव्हे तो त्यांचा हक्क आहे. यासाठी भारत सरकारने हक्काची जोपासणा करण्यासाठी एचआयव्ही प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७ अंमलात आणला आहे. ज्या कायद्याद्वारे एचआयव्हीसह जीवन जगणा–या व्यक्तींना सम्मानपूर्वक वागणूक प्रदान करण्यात आली आहे. जर कोणी कलंकित करत असेल किंवा भेदभाव करत असेल, तर कायद्याने त्यांना शिक्षा देण्यात आली आहे. यावर्षीच्या घोषवाक्यानुसार एकटे नाहीत तुम्ही साथ आहोत आम्ही ही आम्हीपणाची भावना एचआयव्हीसह जीवन जगणा–या लाभार्थ्यांच्या मनामध्ये विविध जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढीस लावणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

चला तर मग आजच्या ०१ डिसेंबर या जागतिक एड्स दिनानिमित्त २ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२४ या सप्ताहामध्ये एड्स जनजागृती सप्ताह अभियानामध्ये आपण सारेजन सहभागी होऊ याः सामाजिक ऋण तसेच राष्ट्रीय कार्यास हातभार लाऊयाः एचआयव्हीबद्दल अधिक विस्तृत माहितीसाठी १०९७ टोल फ्री क्रमांकावर आपण माहिती विचारु शकता किंवा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, बीड येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

–सुहास मनोहरराव कुलकर्णी
(जिल्हा आयसीटीसी पर्यवेक्षक)
जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष,
जिल्हा रुग्णालय, बीड
मो.नं. ९४२००१७५३९

## पेंडगावच्या हनुमान मंदीरात शनि अमावास्या निमित्त भाविकांची गर्दी



गेवराई :

बीडपासून काही अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र पेंडगाव येथे शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी शनि अमावास्या निमित्त पावन हनुमान मंदीरात भाविकांनी दर्शनासाठी लांबच लांब रांगा करत मोठ्या संख्येने गर्दी केली होती. भक्ताच्या नवसाला पावणारा मारुती म्हणून पेंडगावच्या मारुतीची सर्वत्र ख्याती आहे.

पेंडगाव येथील भक्ताला पावणारा मारुती काशीवरुन आल्याची येथील ग्रामस्थांची श्रद्धा आहे. हा प्रत्येक भक्ताला पावणारा मारुती आहे. या मारुती मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक मारुती मंदिरामध्ये एकच मूर्ती असते, मात्र या मंदिरामध्ये दोन मूर्ती आहेत. या ठिकाणी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो, तसेच प्रत्येक शनिवारी पंचक्रोशीतील भाविक भक्तांकडून या ठिकाणी भंडारा महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. तर याठिकाणी भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी येथे पहावयास मिळते.

# शेतकऱ्यांचा अर्थवाद हरला! धर्मवाद जिंकला?

विधानसभा निवडणुकीचा सारीपाट ज्या पद्धतीने जिंकला गेला, आता त्याच व्यवस्थेवर, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजायला लागलेत . मतदारांनी , वैयक्तिक कुवतीप्रमाणे ,स्वतःचे विचारधारेवर मतदान केले. तर ते देशाच्या आर्थिक धोरणावर केले की, जाती– धर्मावर झाले ? हे आता पूर्ण महाराष्ट्राने अनुभवले. देशाला सांभाळणारा दृष्टिकोन कोणता असेल, तर तो आर्थिक आणि व्यवहारिक दृष्टिकोनच तारणारा असतो ?. लोकशाही पद्धतीने निवडणुकीतून सिद्ध करण्यासाठी मतदान हा सामाजिक अधिकार दिला आहे. परंतु निवडणूक ही लोकतंत्र की, दबावतंत्र की , हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरीयच राहिला. आज प्रत्येक कुटुंबात किमान एक –दोन तरी पदवीधर आहेत, किमान त्यांना जगण्याची भाषा तरी कळते. ज्याना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, दृष्टिकोन समजतो. तो खरंच सुशिक्षित झाला असे वाटते काय ? जेव्हा तो मतदान करतो , ते आपण स्व–हक्कासाठी करतो की, स्वतःचे जगण्यासाठी करतो की, आपल्या जातीतला – धर्मातला माणसाला निवडून देण्यासाठी करतो ? या मानसिक गोंधळलेल्या परिस्थितीत तो नेहमी असतो. मग जातीधर्मातल्या निवडून पाठविलेल्या उमेदवाराने आतापर्यंत मूलभूत हक्काचे, आर्थिक धोरणाचे , न्यायव्यवस्थेचे कायदे गरजे नुसार दुरुस्त करण्याचे काम कां केले नाही, आणि आणि सरळ व सुलभ पद्धतीने जगण्याचे प्रश्न, कां सोडविले नाही, हेच अजून मतदारांना कळले आहे की नाही ? मतदान करताना पहिला डोक्यात विचार येतो. तो उमेदवार कोण्या जातीचा ? कोण्या धर्माचा आहे? आणि कोण्या पक्षाचा आहे. मग त्याच्या जातीचे मते किती ? जाती धर्माचा प्रश्न डोक्यात घेऊन जर मतदान होत असेल तर भुकेच्या प्रश्नाचे उत्तरे जातीधर्माच्या निवडणुकीत शोधता येईल काय ? आणि भुकेचा प्रश्न तर आर्थिक धोरणाशिवाय कधीच सुटला नाही ,आणि तो सुटणार ही नाही ? जातीच्या लढाया देशातील सत्तेतील राजेच लावतात,आणि त्यावर सर्रास निवडणुकी घेतल्या जातात. आणि हाऊस मध्ये निवडून गेल्यावर हेच नेते धर्मनिरपेक्षतेच्या शपथा घेतात. तेव्हा राज्यघटना कुठे झोपी जाते? निवडणुकीत तुम्ही किती भुलथापा दिल्यात, कसे जाहीरनामे प्रसिद्ध केले, याचा निवडून आल्यानंतर हाऊस मध्ये काहीही संबंध राहत नाही. जे जाती–धर्माचा प्रचार करून निवडून येतात त्यांनाच विधान भवन, लोकसभेत धर्मनिरपेक्ष म्हणून शपथ कां दिल्या जाते? त्यावेळेस हा उमेदवार कोणता प्रचार करून आला आणि कसा आला ? हे का शोधल्या जात नाही? धर्माची घाण ओकणारा उमेदवार विधान भवनं, व संसदेत गेल्याबरोबर धर्मनिरपेक्ष म्हणून एकदम शुद्ध होतो. ही तर शुद्ध फसवणूक आहे? यासाठी कायदे करणे व बदलविणे गरजेचे आहे? मांजर डोळे मिटून दूध पिते. अशीच न्याय रचना आहे कां ? सत्तेतील धर्मांध व्यक्तीचा संबंध जगताना भुकेशी येतो ? आणि भुकेचा प्रश्न ,अन्न– धान्याशी येतो. म्हणजेच शेतीतून , अन्न धान्यातूनच तर आर्थिक व्यवस्था तयार होते ? आणि या आर्थिक व्यवस्थेवर देशाचा कारभार चालतो ? भारत देशातील नव्हेतर जगाच्या अर्थवादाची सुरवातच शेतीचा पहिला कारखाना उघडून तयार झाली. आणि राज्यकर्त्यांनी तो जगण्याचा अधिकारच जाती– धर्मात नेऊन टाकला ? आणि मतदारांना तो अतिशय गोड वाटून त्यांनी सहकार्य केले ? कारण त्या जाती–धर्माच्या व्यवस्थेला हाऊस मध्ये जाईपर्यंत समाजाने तोंडी मान्यता दिली? बऱ्याच आजी– माजी आमदार – मंत्र्यांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, शेतीतील आर्थिक स्वातंत्र्याच्या धोरणांचे अजूनही त्यांना आकलन नाही. हाऊस मध्ये या विषयाला बगल देणारे सर्व बैल भारती असतात. असेच माजी आमदाराचें चर्चे तून निष्पन्न झाले. त्यांना तर देश हिताचे दृष्टीने आर्थिक स्वातंत्र्याची ट्रेनिंग देणे गरजेचे आहे, हेच जाणवले . मतदार हा पोटातील आगीची लढाई सोडून, जातीची घोंगडी अंगावर घेवून जगतो आहे ? हेच नुकत्याच झालेल्या निवडणुकीतून स्पष्ट झाले निवडणुकीच्या वेळेस हिंदू खत्रेमे है ? तर , अन् मग निवडणूक झाल्यावर तो खतरेच्या बाहेर असतो कां ? जर हिंदूंच्या देशात हिंदू खतरे मे है ? मग सुरक्षित कोण आहे ? भारत देशात ना पंतप्रधान सुरक्षित, ना जनता सुरक्षित ? तर ही अस्थिरता माजवली कोणी ? याचा सरळ अर्थ असे म्हणावे काय– महासत्तेची स्वप्न पाहणारा भारत देश, जाती धर्माची क्रांती करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडवीविनारा देश म्हटले तर आता वावगे होणार नाही. ? म्हणजे देशाला बलशाली, हा धर्मवाद करतो की, अर्थवाद करतो ? हेच लोकशाहीत मतदारांना कळले नाही . म्हणजेच स्वतःच्या जगण्याचा अधिकार सोडून, स्वतःच्या शेतीमालाच्या भावाचा व शेतीचा प्रश्न सोडून राज्यकर्तेच्या गुलामगिरीत तो अजूनही जगतो आहे म्हणतात ना ––– घरक्या रोट्या खाओ , और मामूक्या बकऱ्या चराओ? राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी धर्मवाद बाजूला करून, सुलभ पद्धतीने जगण्यासाठी ग्रामीण अर्थवाद ग्रामगितेतून मांडला. तर त्याचा कधी देशात विचारच झाला नाही आणि मतदारांनी सुध्दा कधीच अर्थवादी धोरणावर मतदान केले नाही ?. ज्या चळवळीतून शरद जोशी या ब्राम्हणाने ओबीसी वर्गाला फुले– शाहू – आंबेडकराची अर्थवादी चळवळ समजून सांगितली, व प्रत्यक्ष लाखो शेतकरी एकत्र करून आंदोलनातून ती वस्तुस्थिती शिकवली. ती चळवळच जाती– धर्माच्या नेत्यांनी मोडून काढली. आणि आता तर शेतकऱ्यांचे पक्षच निस्तनाभूत करण्याचा सपाटा लावला ? आणि मतदाराने सुध्दा नेत्याच्या मताने ऐकून जाती – धर्म वादच जोपासला अन् देशभर वाढवीला. म्हणूनच लाडकी बहिणीला सरकारच्या तिजोरीतील पैसे वाटावे लागले ? शासकीय योजनेच्या नावावर डायरेक्ट खात्यावर पैसे पाठवून लोकमत तयार करन्यासाठी भिकारवाद जोपासल्या गेला . रुग्णांना, विधवांना, निराधार लोकांना ,अपंगांना तिजोरीतील पैसे वाटपाचा कार्यक्रम म्हणजेच सरळ सरळ सरकार पैशाच्या जोरावर मते विकत घेतो. लोकमत विकत घेउन, लाचारीच्या खाली ढकलण्याचे दबावतंत्र वापरल्या जात आहे. शेतकऱ्यांना भीकवादी, अनुदान देऊन जगविण्याचा किळसवाणी प्रकार देशात चालू झाला . शेतकऱ्यानी स्वतः पिकवलेल्या शेतमालाला उत्पादन खर्चानुसार रास्त भाव न देता, पिक विमा , अवकाळी पावसाची नुकसान भरपाई ,कर्जमाफी किंवा अनुदानाच्या मार्गाने पैसे टाकून त्याला जगविण्याचे नाटक केल्या जात आहे. म्हणजे सरकार हेच एक नाटक कंपनी तयार झाली असे जनतेला दिसत आहे. आणि आमचेच सरकार परोपकारी कृपाळू व दयावंत आहे , आणि तो शेतकरी आमच्या सरकारच्या भरोशावर जिवंत आहे असे भासवल्या जाते , खरं तर यात जनतेला शुध्द फसविले जात आहे. तर मग धर्माचेच नावाने मतदाराचे व सर्वांचे पोट भरते, हे राज्यकर्ते कां सांगत नाही. धर्माचे नावाने उपाशा पोटी राहून जर पोटाची आग शांत होत असते , असे कोणत्या धर्माच्या ग्रंथात लिहिले आहे, हे पण सांगितले पाहिजे ना ? आणि असे झाले तर मग शेतकऱ्यांना शेतीतून अधिक उत्पादन काढण्याची सल्ला सरकार कडून कां नेहमी दिल्या जाते?. फुले – शाहू – आंबेडकरांची अर्थवादी चळवळ खलास करण्याचे डावपेच कां आखले जातात ? परंपरेनुसार धर्मशास्त्राची जोपासना करणे , पुरातन विचाराचे संस्कार वापरणे गैर नाही. पुर्वजानी दिलेले संस्कार हे आचरणाचे ध्येय होऊ शकते. धर्म परंपरा ही कौटुंबिक समस्या आहे. त्यातून मुक्त होणे हे सुद्धा कठीण आहे, याचा अर्थ असा आहे कां जातीधर्माचा प्रसार मतदानासाठी वापरणे हे मग योग्य आहे कां ? विधान भवन व संसदेत धर्मवाद चालत नाही तर आर्थिक धोरणे चालतात. पण निवडणुकीत अर्थवादाचे मूळच जाळून टाकल्या जाते अन् भिकारचोट आर्थिक धोरण वापरले जाते. जर पायाच मजबूत नसेल तर बिल्डिंग कोसळल्याशिवाय राहणार नाही. प्रपंचासाठी व जगण्यासाठी तर आर्थिक घडामोडी जोपासणे गरजेचे असते.? शासकीय तिजोरीच्या भरोशावर लाचारीने व भिकारीने मतदारांना जगविन्याची परंपरा सुरू झाली. मतदार हा सुद्धा स्वबळावर, स्वावलंबी होऊन जगण्याची लढाई सोडून, तो सुद्धा जातीची व धर्माची लढाई करायला निघाला.? या धर्माचे लढाईला जगविणारा , त्यांच्या पोटात अन्न टाकणारा, त्यांना खाऊ घालणारा मात्र शेतकरी हरला. तो या व्यवस्थेशी दोन हात करताना हतबल झाला. सरकारने चुकीचे धोरणे वापरून जाणून बुजून तो हवालदिल केला. तो अजूनही हा देश पोसण्यासाठी सक्षम आहे. मात्र राज्यकर्त्यांनी त्याला चकणाचुर करून, जाणीव पूर्वक हरविला आहे. याला दोषीच मतदार आहे. कारण मतदारांना सुद्धा आर्थिक स्वातंत्र्याची भाषा अजून समजली नाही. त्यांना फक्त देश स्वतंत्र झाल एवढेच समजते ? पण हक्काचे व न्यायाचे जगणेसाठी घटनेतील कायदे दुरुस्ती करून, भारतीय संविधानातूनच त्यांची गाडी पंचर केल्या गेली ?. हे सामान्यांना कसे कळेल? त्यांना हे कळले जाऊ नये म्हणून तर, जाती– धर्माची लढाई मतदारांच्या डोक्यात घुसविण्यात आली. कारण याने स्वतःसाठी जगण्याचा अधिकार न वापरता, नेत्याचा आदेश वापरला ? मानसिक गुलामी स्वीकारलेल्या मतदाराला, आर्थिक जगण्याची झळ सोसूनही त्याला अजून पर्यंत समजले नाही, असाच याचा अर्थ निघतो. काँग्रेस व बिजेपी या दोन्ही राजकीय पक्षांनी शेतकरी चळवळ संपविली, मूळ अर्थवाद संपविण्यासाठी खतपाणी घातले. तरी मतदारांनी त्यांनाच भरघोस मतांनी शिकके मारले. ही चूक अजूनही शेतकरी वर्गाला समजली नाही. कारण जाती – धर्माचे बोझ्याखाली, ती त्याला समजुच दिली नाही. जातीचा नेता निवडण्यातच हयात गेली. संपूर्ण आयुष्य बरबाद झाले. शेतकरी म्हणून आणि माझ्या हक्काच्या शेती प्रश्नावर कधी त्याने मतदानच केले नाही ,तर मग शेतकरी प्रश्न सुटणार कसे ? तो जाती– धर्माच्या मानसिक गुलामितच जगला आणि वाढला. त्याने आर्थिक गुलामीची झळ सोसली पण नेत्याचे भरवश्यावर गुलामी पत्करून तो जगत राहिला. हा संपूर्ण दोष व्यस्थेचाच आहे. शेतकरी समाज मानसिक गुलामीचा शिकार केल्या गेला .? जबरदस्तीने तसा तो बनविला, जनतेनीच त्याला मतदानातून हद्दपार केला. बळीराजा, पोशिंदा, शेतकरी राजा , म्हणून वाजविला तुझा आता बाजा, अन अटकली खुटी तर, जाशील कुठी. अशी अवस्था आणून ठेवली. जनतेचा उद्धार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पक्ष व शेतकरी नेते संपविणे हेच काँग्रेस,बोजेपीचे ध्येय आहे. कारण दोन्ही पक्षांची भूमिकाच जातीयवादि नेते निर्माण करण्याची आहे. आणि या समस्येला जनता बळी पडत आहे. कारण ती मतदारांमध्ये अजूनही तशी जागृती नाही. म्हणजे या व्यवस्थेला खतपाणी घालणारे , व मतदान करणारे नागरिक सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत. आता तर जातीव्यवस्था वाढवून शेतकरी अवस्था खलास करून, या पापाचे धनी बनून व मानसिक गुलामीत जगनारेच मतदार तयार झालेत काय,असे वाटते ? आता तरी पुढील घडामोडीसाठी, विचार करून परिवर्तन करण्याची गरज निर्माण झाली आहे ? शरद जोशी म्हणतात –– ना जात, ना पात, ना प्रांत, ना पक्ष, किसान बचाव एकही लक्ष . १)पहिला गणतंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहे. एका नव्या गण तंत्राची उभारणी करून भारताला विश्व विजयाचा मार्ग उघडून देण्याची जबाबदारी देशातील मतदारावर आहे, ही संधी गमावल्यास पहिले गणतंत्र बुडेल व अर्थव्यवस्था कोलमडेल आणि देशाचे फार मोठे नुकसान होईल. २) भारतीय शेतीची गंभीर अवस्था समजण्या इतका अनुभव आणि बौद्धिक क्षमता उमेदवाराकडे आहे किंवा नाही, याची खात्री मतदारांनी करून घ्यावी. कारण शेतीशास्त्र हे व्यवहारिक अर्थशास्त्र आहे. ३) जागतिक मंदी व देशातील आर्थिक मंदी याबद्दल उमेदवाराकडे किंवा निदान पक्षनेत्याकडे पुरेशी जाण आणि उपाय योजना आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी लागेल . ४) शेतकऱ्यांचा व शेतमजुरांचा घाम गाळण्यात दोष नाही, दोष आहे तो भारत देशातील आर्थिक धोरनाचा परिणाम आहे. ५) विधानसभा निवडणुकीत खऱ्या अर्थाने प्रचंड बदल घडवून दाखविण्याचे सामर्थ्य मतदारांनी केले , परंतु ती सर्व व्यवस्था अर्थवादाकडे न जाता, धर्मवादाकडे गेली. ही सत्तेची बीजे ओळखावी लागेल. म्हणजेच सत्तेत व निवडणुकीत शेतकऱ्यांचा अर्थवाद हरला, व धर्मवाद जिंकला ?. हेच सिद्ध होते . पोशिंद्याच्या लढाईकरिता, हक्काचे मतदार बनून, आर्थिक स्वातंत्र्यासाठी निवडणुकीचे माध्यमातून मतदानासाठी सज्ज व्हा ! ,सज्ज व्हा ! जय गुरुदेव.. ..... जय महाराष्ट्र.

**धनंजय पाटील काकडे**
**९८ ९० ३६ ८०५८.**

# राजे आपण आमदार झालात, अभिनंदन आणि शुभेच्छा..!

महाराष्ट्राची ही विधानसभा निवडणूक अनेक कारणांनी गाजली. वेगवेगळे संदर्भ, कित्येक मतमतांतरे, अनेक विचारप्रवाह, विविध कुल्प्त्या, युक्त्या आणि कैक अंदाज या निवडणूकीच्या निमित्ताने चर्चिले गेले. याउपर आपण मोठ्या मताधिक्याने विजयी झालात. राजे आपण आमदार झालात, प्रथमतः आपले मनःपूर्वक अभिनंदन..! येणाऱ्या पाच वर्षात आपल्या हातून ठोस आणि भरीव असे लोकहिताचे आणि विधायक काम होईल या सदिच्छासह पुढच्या वाटचालीस शुभेच्छा.....! आदरणीय दादांचे आशीर्वाद व भैय्यासाहेबांच्या खंबीर साथीने आपण हे यश मिळवले. जनसामान्यांच्या मनातही आपण मागच्या काही दिवसात भावी आमदार म्हणून आपली ओळख निर्माण करू शकलात. त्याचे प्रत्यंतर कालच्या निकालातून दिसले आणि आपण बहुमताने निवडून आलात. याचा मनस्वी आनंद माझ्यासह गेवराईतील मतदार, जिल्ह्यातील आपल्यावर प्रेम करणाऱ्या मोठ्या मित्रवर्गाला देखील झाला. यामुळे विजयराजें पंडित यावेळी आमदार व्हावेत ही मनोमन इच्छा बाळगून असणारे, आपल्याला प्रत्यक्ष मत न देऊ शकणारेही काहीसे सुखावल्याचे चित्र दिसते. खरं तर २०१९ च्या निवडणूकीतच हे व्हायला पाहिजे होते, पण दुर्दैवाने तसे घडले नाही. २००९ चा भैय्यासाहेबांचा निसटता पराभव व मागच्या वेळेची आपली हुकलेली संधी हे शल्य गेवराईकरांना टोचलेल्या काट्याप्रमाणे कायम सलत होते. म्हणूनच आजचा हा तुम्ही मिळवलेला विजय आम्हा सर्वांसाठी खास आहे. आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित म्हणून आपण सभागृहात पदाची शपथ घ्याल तो क्षण आमच्यासाठी गर्वाची बाब असेल. कारण यानिमित्ताने एका सद्गुणी कुटुंबाचा वारसा अन् कर्त्या व सुजाण राजकारणी भैय्यासाहेब यांची ध्येयासक्ती विधानसभा गाजवायला सिद्ध झाल्याचा विश्वास एक मतदार म्हणून आम्हाला वाटू लागला आहे. दादांचे स्वप्न आणि आपल्या प्रगाढ इच्छा शक्तीला अमरसिंह पंडित यांनी स्वकर्तृत्वाने प्रत्यक्षात उतरविले. जयसिंह भाऊ, पृथ्वीराजे, रणवीर काका यांच्या परिश्रमाचा वाटाही या सर्व प्रक्रियेत मोलाचा ठरणारा आहे. सध्या राजकारणात तालुक्याचा आमदार हे पद अत्यंत महत्त्वाचे मानले जाऊ लागले आहे. आमदारकीच्या भोवतीच सगळी सत्ता केंद्र गोळा झालेली असतात. सर्वसामान्य माणूस देखील आपला आमदार म्हणून एक मोठा उसासा सोडत असतो. आणि विजयराजे आपण तर कायम लोकांसोबत राहता, लोकांना सोबत घेऊन, लोकांच्या सुखदुःखात उभे राहता. म्हणून या आमदार पदासोबत आपल्या कडेही वेगळ्या अपेक्षेने पाहिले जाईल. पंचायत समिती, जिल्हा परिषदे मध्ये आपण विविध पदे भूषविली आहेत. त्या कामाचा आवाका पाहता आपण या पाच वर्षातही मतदारसंघाच्या विकासासाठी निश्चितच प्रयत्न कराल हा विश्वास इथल्या प्रत्येक मतदाराला आहे. भैय्यासाहेबांनी आखलेल्या अनेक योजनांना आपल्या काळात मूर्त स्वरूप येईल आणि ज्या अपेक्षेने, आशेने इथला शेतकरी वर्ग, सिंधफणा काठ तुमच्या कडे पाहतो आहे त्याच उंचीचे काम आपल्या हातून होईल यात दुमत असूच शकत नाही. आपली कारकीर्द ही भैय्यासाहेबांसारखीच भरीव योगदानासाठी, शाश्वत विकासासाठी आणि तरूणांच्या भल्यासाठी केलेल्या विविध कामाने ओळखली जावी. तुमची धडपड, तुमच्यातला आवेश आणि प्रश्नांची जाण हे तुम्हाला यासाठी कायम प्रेरित करत राहतीलच. कृतीशील विचारांचा वारसा जोपासणारे आपण आहात. समस्यांच्या निराकरणासाठी धडपडणारे आपण आहात. सुखात, आनंदात सहभागी होणारे आपण आहात आणि दुःखाच्या वेळी आधार देऊन, संकटात सोबत उभे राहणारे देखील आपण आहात. म्हणून येणारी पाच वर्ष आपल्या भरीव योगदानासाठी खुली झाली आहेत. ती संधी आपण आमदार म्हणून अशी साधाल की, पुढच्या विधासभेच्या निवडणूकीत तुम्हाला स्वतःच्या प्रचाराची गरजही भासणार नाही आणि विकासाचा, सर्वसामान्यांच्या नेता म्हणून तुमच्या निवडणूकीची जबाबदारी कार्यकर्ते, मतदार स्वयंस्फुर्तीने उचलतील, अन् आपल्या भूमिकेमुळे, विकासकामांमुळे, कार्यकर्त्यांना जीवापाड जपल्यामुळे येणाऱ्या दोन तीन टर्म तुम्हाला विरोध कराय ी एकही संधी कुणाला मिळणार नाही.

**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे**
**मराठी विभाग,**
**कला व विज्ञान महाविद्यालय**
**शिवाजीनगर गढी. ता. गेवराई**
**जि. बीड**
**संपर्क – ८२०८६९४०३७**

# बाळासाहेब आजबेंना विधान परिषदेवर घेण्याची कार्यकर्त्यांची मागणी

## मुंडे व पवार घराण्याशी एकनिष्ठ राहिलेल्या बाळासाहेब आजबेंना न्याय मिळणार का ?

## उठणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही हे वाक्य आजबेंना सूट होतं









**पाटोदा प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाच राजकारण हे अनेक वर्षापासून पाडापाडी आणि सोडा सोडी असंच पाहायला मिळाला आहे त्याचं कारणही असा आहे एखाद्याला कोणता पद घ्यायचा असेल की कोणाचा तरी गेम करायचा आणि स्वतःचा स्वार्थ साधायचा असं चित्र आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाम ध्ये पाहायला मिळाला आहे. मग जिल्हा परिषद असो किंवा आमदारकी असो त्या ठिकाणी कोणताही नेता आपल्या स्वार्थासाठी काहीही करायला तयार आहे. पण याला अपवाद राहिले आहेत ते बाळासाहेब आजबे काका कारण की त्यांनी आज पर्यंत कोणाला धोका दिला नाही कोणाला फसवलं नाही याउलट एकनिष्ठ राहून स्वतःची निष्ठा काय आहे हे दाखवून दिल आहे त्यामुळे जनतेम ध्ये त्यांच्याबद्दल आपुलकी अध्यापटी कोण आहे. असे नेते राजकारणात असायला हवेत म्हणूनच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून सर्वसामान्य जनता आणि कार्यकर्त्यांमधून त्यांना विधान परिषद मिळावी अशी मागणी होत आहे.चांगले नेते राजकारणात यायला हवेत. राजकारणात चांगल्या नेत्यांची कम तरता आहे. फसवा फसवी आडवा आडवी पाडापाडी सोडा सोडी असे करणारे नेते अनेक आहेत परंतु एकनिष्ठ राहून नेत्याप्रती समाजाप्रती आपली भावना स्वच्छ आणि निर्मळ असायला हवी हेच काम आमदार बाळासाहेब आजबे यांनी त्यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात केला आहे म्हणूनच त्यांच्यावर कार्यकर्तेही तितकाच जीव ओवाळून टाकतात आणि आजबे काकाही कार्यकर्ते आणि जनतेवर जीव ओवाळून टाकतात म्हणूनच सर्वसामान्य जनतेमधून पुन्हा त्यांना विधान परिषदेवर घेऊन जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी आणि राजकारणातील एकनिष्ठ नेत्याला न्याय द्यावा अशी मागणी होत आहे. विशेष करून स्वर्गीय मुंडे साहेबांनी आजबे काकांवर टाकलेला विश्वास त्यांनी शेवटपर्यंत टिकून ठेवला साहेब गेल्यानंतर त्यांना म्हणावा असं महत्त्व दिलं गेलं नाही म्हणून त्यांनी पक्ष सोडला परंतु साहेबा बद्दलची निष्ठा दुस-या पक्षातही त्यांनी तितकीच टेकून ठेवली. राष्ट्र वादी चिन्हावर निवडून आल्यानंतर देखील त्यांनी मिरवणुकीत स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचा फोटो हातात घेऊन त्यांच्याबद्दलची निष्ठा आणि प्रेम व्यक्त केलं हे सर्व जनतेने पाहिलं त्यांनी कधीही मुंडे कुटुंबीयांवर टीका तर सोडाच पण कधी राजकीय माध्यमातून देखील काही बोलले नाहीत याला म्हणायचं निष्ठा आणि हेच आजबे यांचं वेगळेपण आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील जनतेला कार्यकर्त्यांना आपलंसं वाटतं म्हणूनच आजबे काकांना पुन्हा एकदा विधान परिषदेवर घेऊन आमदार करून जनतेची सेवा करण्यात संधी द्यावी अशी मागणी आष्टी पाटोदा शिरूर म तदार संघातून कार्यकर्ते सर्वसामान्य जनता करत आहे.

### विधान परिषदेवर आजबे आमदार झाल्यास चित्र बदलेल!

मुंडे व पवार कुटुंबीयांनी मा.आ. आजबेंना पुन्हा एकदा विधान परिषदेवर आमदार करून जनतेची सेवा करण्याची संधी दिल्यास आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात राजकीय चित्र नक्कीच बदलेल अशा चर्चा सुरू आहेत. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे राजकीय चित्र सध्या वेगळ्या दिशेने सुरू आहे त्यामुळे पुन्हा एकदा विधान परिषदेवर आजबेंना आमदार करून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे राजकीय चित्र सुरळीत करण्याची संधी द्यावी अशी मागणी सुद्धा आणि चर्चा होत आहेत..

### आ.पंकजा मुंडे, आ.धनंजय मुंडे, आ.अजित पवारांनी ठरवलं तर काका आमदार

बीड जिल्ह्याच्या राजकारणात सध्या पाहायला मिळत असलेलं चित्र यावरून आता सर्वसामान्य जनता आणि कार्यकर्त्यांमधून एक सूर निघत आहे. पंकजाताई धनंजयभाऊ आणि अजितदादांना सर्वसामान्य कार्यकर्ते विनंती करत आहेत की बीड जिल्ह्यातील राजकारण वेगळ्या दिशेने चालला आहे यामध्ये आता निष्ठावंत विकासाची दृष्टी नेत्यांची गरज आहे म्हणूनच बाळासाहेब आजबे यांना आमदार करून राजकारणात नवीन ट्विस्ट आणावा आणि सर्वसामान्य जनतेला मानसिकदृष्ट्या आधार द्यावा अशी मागणी होत आहे. मानसिक दृष्ट्या आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील सर्वसामान्य जनता खचली आहे, त्यांना आधार देण्यासाठी मुंडे आणि पवार घराण्यांनी आजबे यांना आमदार करून मानसिक दृष्ट्या आधार द्यावा अशी मागणी होत आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधानपरिषदेवर संधी द्या

## रवी काळे, गजानन जवकर यांची ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी





बीड (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातून महायुतीकडून निवडणूक लढविली. अल्पशा मताने त्यांचा निसटता पराभव झाला. त्यांच्याकडे बीडच्या विकासाचे व्हिजन आल्याने पक्षाने त्यांना विधानपरिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी युवा नेते रवी काळे, गजानन जवकर यांनी केली आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार, धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून बीड मतदारसंघात अनेक विकासाची कामे झाली. डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांनी मागील एक ते दीड वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला. त्या माध्यमातून बीड मतदारसंघातील शहरी आणि ग्रामीण भागात अनेक विकासाची कामे केल्यामुळे त्यांचा विजय हा निश्चित मानला जात होता. परंतु त्यांचा अल्पशा मताने पराभव झाला. त्यांच्याकडे बीडच्या विकासाचे व्हिजन आहे. उच्चशिक्षित, कार्यक्षम नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. दीड ते दोन वर्षाच्या कालावधी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत केले, ध्येय धोरणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, जिल्ह्याचे नेते ना.धनंजय मुंडे यांनी विधानपरिषदेवर डॉ.योगेश क्षीरसागर यांना संधी द्यावी, अशी मागणी युवा नेते रवी काळे, गजानन जवकर यांनी केली आहे

# शिक्षणयोगी पंडित पवळे या गौरवग्रंथाचे ५- डिसेंबर रोजी प्रकाशन सोहळा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण संपादित ङ्कशिक्षणयोगी : पंडित पवळेङ्क या गौरवग्रंथ-ाचे प्रकाशन 5-डिसेंबर रोजी गुरुवारी सायंकाळी 5 वाजता ताज पाटील हॉटेलचे सभागृह, आय.टी.आय.जवळ, नांदेड येथे लोहा-कंधारचे आ.मा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.मनोहर चासकर, विशेष पोलीस महानिरीक्षक मा. शहाजी उमाप यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

यावेळी माजी आ.मा.मोहनअण्णा हंबर्डे, गोदावरी समूहाच्या अध्यक्षा मा.राजश्री पाटील, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.कामाजी पवार, लक्षवेध फाउंडेशनचे अध्यक्ष मा.एकना-थराव मोरे, पूर्व शिक्षण संचालक मा.डॉ. गोविंद नांदेडे, प्रसिद्ध विधीज्ञ मा.ॲड.डी.के.हंडे, मराठवाडा साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा.प्रा.डॉ.जगदीश कदम, ज्येष्ठ साहित्यिक मा.डॉ.सुरेश सावंत, दैनिक गोदातीर समाचारचे मुख्य संपादक मा.केशव घोणसे पाटील, पूर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. शिवाजीराव कपाळे, पूर्व शिक्षणाधिकारी मा. शिवाजीराव खुडे, परभणी जिल्हा परिषद (म.बा.) च्या उपमुख्यकार्यकारी अधि-कारी मा. रेखा काळम, मधुकरराव देशमुख, इंजि. शे.रा. पाटील, इंजि. तानाजी हुस्सेकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध वक्ते इंजि. शिवाजीराजे पाटील यांचे राहणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निर्मल प्रकाशन व गौरवग्रंथ समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# लिंबागणेश उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेअभावी रब्बी पिके धोक्यात



लिंबागणेश: बीड तालुक्यातील लिंबागणेश आणि पंचक्रोशीतील गावांमधील विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतकऱ्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.५ डिसेंबर गुरूवार रोजी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन कार्यकारी अभियंता महावितरण बीड यांना दिले आहे. निवेदनावर विक्की वाणी, हरिओम क्षीरसागर,अक्षय वाणी, महादेव कुदळे,जनार्धन वाणी, सय्यद बशीर, राजेंद्र ढास, श्रीकांत शिंदे, शिवाजी ढास, नानासाहेब वायभट, संतोष भोसले आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत. लिंबागणेश आणि पोखरी (घाट) गावाला भायाळा साठवण तलावातुन पाणीपुरवठा होत आहे.मात्र कमी दाबाचा वीजपुरवठा विद्युत मोटारी सुरळीत चालत नाहीत. त्यामुळे गावाचा पाणीपुरवठा १५ दिवसांपासून बंद असुन पाण्यावाचुन ग्रामस्थांचे हाल होत आहेत. पोखरी ( घाट) येथुन पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र फीडरची व्यवस्था करण्यात यावी. लिंबागणेश येथील उपकेंद्रातील उप अभियंता पद अडीच महिन्यांपासून रिक्त असुन दिवसा कार्यालयात लाईनमन हजर नसतात.विजे संदर्भात फोन केला तर घेत नाहीत टाळाटाळ करतात. मुख्यालयी लाईनमन रहात नसल्याने रात्री अपरात्री फ्युज टाकणे आदी कामे ग्रामस्थांनाच जीव मुठीत धरून करावी लागतात.कारण गावठाण रोहित्रांची दुरावस्था असुन जळालेले केबल,उघडे वायर, झाडांच्या फांद्यामधुन गेलेल्या विजेच्या तारा सगळंच धोकादायक असुन एखादी दुर्दैवी घटना घडल्यास महावितरण कार्यालय जबाबदारी घेणार काय?? असा संतप्त सवाल ग्रामस्थ हरिओम क्षीरसागर यांनी केला आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागर यांना विधान परिषदेवर सदस्य म्हणून संधी द्या - विनोद हातागळे





**बीड प्रतिनिधी :-**

विधान सभा निवडणूक २०२४ मध्ये बीड विधानसभा मतदारसंघ २३० मधुन राष्ट्र वादी कॉग्रेस पक्ष व महायुतीचे उमेदवार डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचा निसटता पराभव झालेला असून हा आमच्यासाठी कार्यकर्ता म्हणून वर्मी घाव लागलेला आहे. डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांनी आमच्या सारख्या विविध सामाजिक संघटनाना बळ देवून सामाजिक सलोखा अबाधीत राखण्याचे अमुल्य कार्य केले आहे. ते पुढे निरंतर सुरु ठेवण्यासाठी डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचे व्यक्तिम त्व, सर्वागिण विकासाचा दुरदृष्किोन, पक्ष बांधणी, पक्ष निष्ठा, या बाबी लक्षात घेवुन त्यांना विधान परिषदेवर सदस्य म्हणून संधी द्यावी. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी जनतेने मोठा कौल दिला आहे. बीड विधानसभेत जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर हे तत्पर असून त्यांनी मागील काही वर्षात महायुतीच्या काळात विविध विकासकामे करून जनतेच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले याची पावती म्हणून महायुतीकडून डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांना विधानसभेची उमेदवारी दिली गेली मात्र या निवडणुकीत डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचा निसटता पराभव झाला आहे. बीड विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी विधान परिषदेची संधी देऊन बीडच्या जनतेच्या मनातील खरा आमदार म्हणून संधी द्यावी अशी मागणी आर्या सामाजिक प्रतिष्ठान बीड जिल्हा संस्थापक अध्यक्ष विनोद हातागळे यांनी केली आहे

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# कोण म्हणतं जरांगे फॅक्टर चालला नाही, हा आमदार म्हणाला, माझ्यासाठी तर ?

**आता या आमदाराने पण जरांगे फॅक्टरविषयी एक मोठं विधान केलं आहे. त्याची संपूर्ण राज्यात जोरात चर्चा आहे.**

**प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने महाविकास आघाडीला धोबीपछाड दिला. महाविकास आघाडीला ५० जागा मिळवताना मोठी दमछाक झाली. तर महायुतीचा झंझावात दिसून आला. महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवलं. तर भाजपाने मॅजिक फिगरपेक्षाही उत्तुंग कामगिरी केली. या सर्व घाडमोडीत जरांगे फॅक्टर निष्प्रभ ठरल्याची आवई उठली. लोकसभेत जरांगे फॅक्टरचा महायुतीला मोठा फटका बसला होता. तर आता विधानसभेला मात्र तो प्रभाव दिसून आला नाही, असा दावा करण्यात आला. हा दावा मनोज जरांगे पाटील यांनी खोडून काढला. तर काहींनी मराठा उमेदवारांची यादीच वाचून धाकवली. त्यात यावेळी मराठा आमदारांची



संख्या वाढल्याचा दावा करण्यात आला. आता या सर्व चर्चेत आमदार अभिजीत पाटील यांनी पण उडी घेतली आहे. त्यांनी जरांगे फॅक्टरविषयी मोठे विधान केले आहे. त्याची राज्यभर चर्चा होत आहे. ऊसाला ३५०० रुपये दरविधानसभा निवडणुकीच्या प्रचारात ऊसाला ३५०० रुपये दर देण्याचे जाहीर करून शब्द दिला होता. लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. मी दिलेला शब्द नेहमीच पाळतो.३५०० रुपये दर देणे अवघड नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. पण विरोधक चुकीच्या बातम्या पेरुन वल्गना करीत अफवा पसरवत आहेत. याचा विरोधकांना काडीमात्र ही फायदा होणार नाही.विठ्ठल कारखान्याची निवडणूक लढताना २५०० रुपये दर देणार सांगीतले होते. तो दिला. आता तर ३५०० रुपये दर डोळे झाकून देणार आहे, असा दावा पाटील यांनी केला. आपल्या दाव्यात कुठलीही शंका बाळगायचं कारण नाही. कारखान्यावर वाहने लावायला देखील जागा नाही. विठ्ठल कारखाना मजबुतीने चालू आहे, असे ते म्हणाले.

## जरांगे फॅक्टरचा मला फायदा

जरांगे फॅक्टरविषयी मतमतांतरे आहेत. काही जणांचा हा फॅक्टर चालल्याचा दावा आहे. तर काही जणांनी हा दावा खोडून काढला आहे. तर माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्याला मनोज जरांगे फॅक्टरचा मोठा फायदा झाल्याचा दावा केला आहे. शरद पवार गटाचे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत अटीतटीच्या लढतीत विजयश्री खेचून आणला होता. त्यांच्याविरोधात मोठी राजकीय फळी उभी असताना आणि मतदान विभागणीसाठी उमेदवार उभे असतानाही त्यांनी विजय मिळवला. त्यांनी या विजयाचे श्रेय मनोज जरांगे पाटील यांना दिले आहे.

# आमदार प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा : तुषार माने

**माजलगाव /प्रतिनिधी** :माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा अशी मागणी माजलगाव मतदारसंघातील जनतेतून होत असून. नुकतीच माजलगाव विधानसभा निवडणुक पार पडली असुन माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे. मागील तीस ते पस्तीस वर्षाच्या कार्यकालामध्ये आ. प्रकाश सोळंके यांनी मतदारसंघातील विकास कामांना जालना दिली असून मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे मतदारसंघात केली आहेत. तर जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघातील बहुतांशी



शेतकरी आज घडीला समृध्द झाल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. त्याचबरोबर माजलगाव या ठिकाणी एम.आय.डी.सी. उभारली गेली असून येथे असणाऱ्या उद्योगामुळे याठिकाणी सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटला आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी मतदार संघामध्ये अनेक केलेल्या जनहिताच्या व विकास कामाच्या जोरावरच मतदारसंघातील जनतेने आ. सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघात निवडुण देऊन जनतेच्या मनातील विकसनशील आमदार प्रकाश सोळुंके यांना मंत्रिमंडळात समावेश करावा. असे मत तुषार माने यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.


## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात घरगुती गॅस सुरक्षा उपाययोजना कार्यशाळा संपन्न




येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने सदरील शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये येथील योगायोग गॅस एजन्सी च्या संपूर्ण टीमने मार्गदर्शन केले. या मध्ये त्यांनी गॅस सुरक्षा संदर्भातील व्हिडिओ दाखवले, सुरक्षेच्या उपायोजना प्रात्यक्षिका सहित सादर केल्या. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे योगायोग गॅस एजन्सी चे श्री अंकुर गरड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर डॉ. सुनील पाटील डॉ. ज्ञानेश्वर गवते, अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या डॉ. साधना घडसिंग प्रा. अंकुश साबळे प्रा. लक्ष्मीकांत सोनार उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते

# धारूर येथील कस्तूरबा गाधी बालीका विद्यालय व ज़िवन ज्ञानदीप गुरूकुल मेध्ये बाल विवाह मुक्ती कार्यक्रम संपन्न

धारूर / प्रतिनिधी जिल्हा बाल विवाहमुक्त करण्यासाठी गावा गावात घुमतोय बाल विवाह प्रतिबंध शपथेचे वारे वाहत असुन युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचा बाल विवाह मुक्त भारत अभियानाला सर्वत्र पाठींबा मिळता आहे. बाल विवाह मुक्त भारत अभियानाला बीड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. धारूर येथील कस्तुरबा गाधी बालिका विद्यालय व जिवन ज्ञानदीप गुरूकुल मधील विद्यार्थीनीना बाल विवाह प्रतीबंधक शपथ देऊन कॅण्डल पेटवण्यात आल्या केंद्र सरकारने नवी दिल्ली येथे मबाल विवाह मुक्त भारतफ अभियानाची सुरूवात केली असून, बीड जिल्हा प्रशासनाने या अभियानाला मोठा पाठिंबा दिला आहे. जिल्ह्यातील ३६१३ शाळांमध्ये बाल विवाह विरोधी [illegible] घेण्यात आली. याशिवाय कॅण्डल मार्च, मशाल मार्गदर्शन, चावडी बैठका, ग्रामसभा आणि इतर जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून या मोहिमेचे समर्थन करण्यात आले.धारूर येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय आणि जीवन ज्ञानदीप गुरुकुल येथील निवासी वसतिगृहांमधील २२० विद्यार्थी– विद्यार्थिनींनी कॅण्डल लावून बाल विवाह विरोधी शपथ घेतली. यावेळी दोन्ही वसतिगृहातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. संतोष रेपे यांनी मुलांना बाल विवाह कायदा, त्याचे महत्त्व, आणि मुलींच्या जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी बाल विवाह रोखण्यासाठी शपथ घेतली आणि विविध



घोषणा दिल्या. या अभियानाच्या निमित्ताने २०३० पर्यंत बीड जिल्हा बाल विवाह मुक्त करण्याचा संकल्प करण्यात आला. युवा ग्राम विकास मंडळ, केज ही जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन या मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या देशव्यापी युतीचा एक भाग आहे. या युतीत २५० पेक्षा अधिक सामाजिक संस्थांचा समावेश असून, त्या मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात प्रकल्प संचालक एच पी देशमुख युवा ग्राम यांच्या मार्गदर्शनाखाली ५० गावे बाल विवाह मुक्त करण्यासाठी विशेष काम चालू आहेबाल विवाहाला समाजातून हद्दपार करण्यासाठी या अभियानामुळे सकारात्मक ऊर्जा आणि जनजागृतीचा मोठा प्रभाव पडत असल्याचे जिल्ह्यातील शाळांमधून दिसून आले आहे. मुलीन साठी नवी आशा निर्माण करणारी चळवळसमन्वयक –– संतोष रेपे ही चळवळ देशातील बालविवाहाच्या उच्छेदासाठी एक प्रभावी पाऊल ठरत आहे. अनेक स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींनी एकत्रित काम केल्यामुळे देशभरात ही चळवळ यशस्वी होत आहे. या उपक्रमाने देशाच्या हजारो मुलींसाठी नवी आशा निर्माण केली आहे. असे उद्गार युवा ग्राम विकास मंडळाचे कार्यक्रम समन्वयक संतोष रेपे याऩी कस्तूरबागांधी बालीका विद्यालयात मार्गदर्शन करताना सांगीतल

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन संविधान दिन साजरा

**माजलगाव प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ.भागवत साळवे हे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आद. एस बी मोरे हे होते तर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे ता संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तर या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रियशिक्षिका लिलाताई उजगरे, सुजाता टाकणखार यांनी मार्गदर्शन केले या प्रसंगी एसबी मोरे यांनी भारतीय संविधान या विषयी सकोल आसे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरे आप्पा यांनी मानले भारतीय



संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करुण शरणतय घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभेच्या शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव, भारतीय बौद्ध महासभा ता संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे, गुलाब प्रधान, एस एस गायसमुद्रे, दयानंद मोरे, डी पी वाघमारे नाना, शारदाताई तांगडे, वैशाली गायकवाड, राजेभाऊ साळवे, गौतम सरपाते सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका उपस्थित होते.

## सौ. प्राजक्ता म्हाप्रोळकर यांना ग्रंथालय आणि माहिती शास्त्रची पी एच डी प्रदान.



मुबई येथील कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन या ठिकाणी सिनियर लायब्रेरियन या पदावर कार्यरत असलेल्या सौ. प्राजक्ता म्हाप्रोळकर यांना नुकतीच ग्रंथालय व माहिती शास्त्र या विभागातून संशोधन केल्या बद्दल एस एन डी टी महिला महाविद्यापीठ अंतर्गत ङ्कमुंबई आणि ठाणे विभागातील महिला ग्रंथपालांचा व्यावसायिक विकास आणि त्यामधील येण–या अडचणीङ्क या विषयावर पी एच. डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. त्यांचे गाईड म्हणून डॉ. ज्योती बाबल यांनी अचूक मार्गदर्शन केले तर डॉ. सुभाष चव्हाण , डॉ., डायरेक्टर – एस. एन. डी. टी. महिला महाविद्यालय तसेच डॉ. भुपेंद्र बनसोड डॉ. सारिका सावंत, तसेच डॉ. दिलीप जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शनपर प्रोत्साहन लाभले. सौ. तृप्ती तुळसनकर , कादंबरी मांजरेकर,संध्या यादव, डॉ.मनीषा दांडगव्हाळ, मनीषा सामंत, डॉ.मीना सूर्यवंशी, डॉ. शीला गोडबोले, गीतांजली वाणी यांनी वेळोवेळी सहकार्य केले. डॉ. प्राजक्ता म्हाप्रोळकर यांना मिळालेल्या यशात त्यांच्या कुटुंबियांचा देखील खूप मोलाचा वाटा आहे. या यशा बद्दल शैक्षणिक सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com